18 जुलै 2022 - लोकमत

# स्पर्धा परीक्षांसाठी संगणकीय उपकरणांचा लाभ व्हावा

## वेदांतिकाराजे भोसले; सोमर्डी वाचनालयासाठी दीड लाखाचे साहित्य भेट

**कुडाळ, ता. १७ :** वाचनाच्या माध्यमातून सुसंस्कृत पिढी निर्माण होते. स्पर्धेच्या युगात वाचनसंस्कृती बरोबरच आधुनिक तंत्रज्ञानालाही महत्त्व देणे गरजेचे आहे. सोमर्डीसह कुडाळ, करहर परिसरात वाचन संस्कृती रुजविण्यामध्ये सुभाषचंद्र बोस वाचनालयाचे बहुमूल्य योगदान आहे. वाचनालयामार्फत चालवलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचा अभिनव उपक्रम खऱ्या अर्थाने तालुक्यातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी लाभदायी ठरत आहे, असे मत कर्तव्य सोशल ग्रुपच्या अध्यक्षा वेदांतिकाराजे भोसले यांनी व्यक्त केले.

सोमर्डी (ता. जावळी) येथील नेताजी सुभाषचंद्र बोस वाचनालयासाठी दीड लाखाचे संगणकीय साहित्य भेट देण्यात आले, त्या वेळी त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या, "जावळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याकरिता मोफत मार्गदर्शक व अभ्यासिका नेताजी सुभाषचंद्र बोस वाचनालयाच्या माध्यमातून सुरू आहे. या वाचनालयात येणाऱ्या विद्यार्थी व युवा वर्गाला पुस्तकांबरोबरच संगणकाचा खऱ्या अर्थाने लाभ व्हावा." वाचनालयाचे अध्यक्ष संदीप परामणे म्हणाले, "येथील ग्रंथसंपदेमध्ये स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याने जावळीतील अनेक सरकारी अधिकारी झालेल्या युवकांनी आपले स्वप्न साकार केले आहे. याची दखल घेत कर्तव्य सोशल ग्रुपच्या अध्यक्षा वेदांतिकाराजे भोसले यांनी दीड लाख रुपयांचे संगणकीय साहित्य या वेळी भेट दिले आहे. त्याचा निश्चितच येथील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे." या वेळी मान्यवर, वाचनालयाचे पदाधिकारी, सरपंच, ग्रामस्थ उपस्थित होते.



**सोमर्डी : सुभाषचंद्र बोस वाचनालयाच्या वतीने वेदांतिकाराजे भोसले यांचा सत्कार करताना अध्यक्ष संदीप परामणे.**

**(महेश बारटक्के : सकाळ छायाचित्रसेवा)**